Epaper

दैनिक जन

सत्याचे प्राईम्स

सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

। रविवार, दि. १८ ऑक्टोंबर २०२६ । वर्ष १ । अंक १८८ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

DIGITAL EDITION

शिवसेनेच्या काही मंत्र्यांना मंत्रिमंडळातून डच्चू मिळणार?
(पान २ वर)



Selected

'आपले सरकार' पोर्टल बुधवारपर्यंत बंद

मुंबई । डेटा सेंटरचे स्थलांतर आणि तांत्रिक प्रणालीचे अद्ययावतीकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या 'आपले सरकार' पोर्टलवरील सेवा तात्पुरत्या बंद केल्या जाणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, १६ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ४ ते २१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीसाठी पोर्टलवरील सेवा बंद राहणार आहे. शासनाकडून शासकीय सेवा अधिकाधिक ऑनलाइन करण्यावर भर दिला जात असताना, तांत्रिक कारणांमुळे सेवा अनेक दिवस बंद राहिल्यास नागरिकांची गैरसोय होऊ शकते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश, शिष्यवृत्ती अर्ज, विविध प्रमाणपत्रे आणि अंतिम मुदतीशी संबंधित कामे प्रलंबित राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे पोर्टल बंद असलेल्या कालावधीत पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, मुदतीच्या आत अर्ज सादर करू न शकलेल्या नागरिकांना आवश्यकतेनुसार दिलासा द्यावा.

सतीश चव्हाणांना संजय शिरसाटांचा जाहीर पाठिंबा

महायुतीत बेबनाव उरलेला नाही!

अमरावतीतील बंडखोरीच्या वादावर पडदा; वरिष्ठांच्या बैठकीनंतर गैरसमज दूर झाल्याचा दावा

जन सम्राट टाईम्स

छत्रपती संभाजीनगर | मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीतील उमेदवार सतीश चव्हाण यांच्या पाठिंब्यावरून महायुतीमध्ये निर्माण झालेला तणाव अखेर निवळल्याचा दावा मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे. सतीश चव्हाण यांनी शिरसाट यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला.

अमरावतीतील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमध्ये मतभेद निर्माण झाले होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराने बंडखोरी केल्यानंतर स्थानिक पातळीवर बंडखोर उमेदवारांना मदत केली जात असल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे शिवसेनेच्या नेत्यांनी मराठवाडा पदवीधर मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे उमेदवार सतीश चव्हाण यांना पाठिंबा देण्याबाबत नाराजी व्यक्त केली होती. या मुद्द्यावर मंत्री संजय शिरसाट यांनी आक्रमक भूमिका घेतल्याने महायुतीतील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले. त्यातून अजित पवार गटातही अस्वस्थता निर्माण झाल्याची चर्चा होती. महायुतीतील तणाव दूर करून निवडणुकीत एकजूट कायम ठेवण्यासाठी सतीश चव्हाण यांनी पुढाकार घेतला. ते सकाळी दहा वाजता संजय शिरसाट यांच्या शासकीय निवासस्थानी भेटीसाठी पोहोचले. या भेटीपूर्वी त्यांना सुमारे १५ मिनिटे प्रतीक्षा करावी लागल्याची माहिती आहे.



त्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये सविस्तर चर्चा झाली. अमरावतीतील बंडखोरीच्या मुद्द्यावर तोडगा निघाल्यानंतर चव्हाण यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला. भेटीनंतर बोलताना सतीश चव्हाण म्हणाले की, पदवीधर निवडणुकीच्या निमित्ताने आपण शिरसाट यांची भेट घेतली. काही किरकोळ गैरसमज निर्माण झाले होते; मात्र वरिष्ठ नेत्यांच्या पातळीवर चर्चा झाल्यानंतर ते दूर झाले आहेत. महायुतीतील सर्व पक्ष एकत्रितपणे काम करतील आणि निवडणुकीत जोरदार विजय मिळवतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. संजय शिरसाट यांनी सांगितले की, अमरावतीतील शिक्षक मतदारसंघाची जागा शिवसेनेकडे असल्याने तेथील बंडखोरीचा मुद्दा महत्त्वाचा होता. बंडखोर उमेदवाराला कोणत्याही घटकाने मदत करू नये, अशी भूमिका मांडण्यात आली होती. गेल्या दोन दिवसांतील राजकीय घडामोडींनंतर बंडखोराला सहकार्य न करण्याचा निर्णय झाल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर सतीश चव्हाण यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

एकजुटीची परीक्षा निवडणुकीत!

महायुतीतील मतभेद मिटल्याचा दावा करण्यात येत असला, तरी प्रत्यक्ष निवडणुकीत घटक पक्षांचे कार्यकर्ते कितपत समन्वयाने काम करतात, यावर या एकजुटीची खरी परीक्षा होणार आहे. सतीश चव्हाण यांना मिळालेल्या पाठिंब्यामुळे महायुतीच्या प्रचाराला बळ मिळण्याची शक्यता असून, बंडखोरीचा मुद्दा निवडणुकीत किती प्रभाव टाकतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याआधी नाशिकमध्ये तयारी! फडणवीसांनी घेतला विकासकामांचा आढावा

जन सम्राट टाईम्स

नाशिक । प्रतिनिधी: आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक-त्र्यंबकेश्वर परिसरात सुरू असलेली विविध विकासकामे वेगाने पूर्णत्वाकडे जात असून, या कामांमुळे नाशिक व त्र्यंबकेश्वरचा चेहरामोहरा बदलणार आहे. पुढील २५ ते ३० वर्षांचा विचार करून आधुनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याबरोबरच भाविक, पर्यटक आणि नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सुरू असलेली सर्व कामे निर्धारित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. सिंहस्थ महाकुंभमेळ्याच्या ध्वजारोहण संमारंभाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांनी आज त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट तसेच नाशिक येथील द्वारका सर्कल तसेच ओझर विमानतळ येथे भेट देऊन सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची सद्यस्थिती, प्रगती आणि भविष्यातील नियोजनाची माहिती घेतली. यावेळी कामांची गती वाढवून ती वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.यावेळी पालकमंत्री गिरीश महाजन, जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव तथा पालक सचिव एकनाथ डवले, आमदार हिरामण खोसकर, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय ऐनपुरे, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ. एस. व्ही. स्वामी, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, एमएसआयडीसीचे अधिकारी ब्रिजेश दीक्षित उपविभागीय अधिकारी पवन दत्ता, तहसीलदार गणेश जाधव, मुख्याधिकारी गोविंद जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने सुरू असलेली कामे केवळ कुंभमेळ्यापुरती मर्यादित नसून, पुढील २५ ते ३० वर्षांसाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासाचा पाया मजबूत करणारी आहेत. आधुनिक शहराच्या दिशेने वाटचाल करताना वाहतूक व्यवस्था, पायाभूत सुविधा, भाविक व पर्यटकांसाठी सुविधा तसेच नागरिकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने ही कामे परिवर्तनात्मक ठरणार आहेत. पुढील टप्प्यात विमानतळाशी संबंधित विकासकामांनाही गती मिळणार आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभाग आणि यंत्रणा समन्वयाने काम करीत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.महानगरपालिका, एमएसआरडीसी, सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन तसेच विविध संबंधित विभागांच्या समन्वयातून ही कामे सुरू आहेत. पालकमंत्री, लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांचा समन्वय तसेच सर्व यंत्रणांची एकत्रित टीम म्हणून सुरू असलेली कामगिरी कौतुकास्पद आहे. या विकासकामांना गती देणाऱ्या सर्व यंत्रणांचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अभिनंदन केले. त्र्यंबकेश्वर येथील दर्शनपथ व गोदाघाट परिसरातील कामे आव्हानात्मक असली तरी ती नियोजनबद्ध पद्धतीने सुरू असून, परिसराचा चेहरामोहरा बदलण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत. देशभरातून येणाऱ्या भाविकांची वाढती संख्या लक्षात घेऊन आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत. धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने त्र्यंबकेश्वरचे महत्त्व अधिक व्यापक करण्यासाठीही या कामांचा उपयोग होणार आहे.नाशिक येथील द्वारका सर्कलचे काम अत्यंत महत्त्वाचे आणि आव्हानात्मक आहे. मात्र, हे काम नियोजनबद्ध पद्धतीने वेगाने सुरू असून निर्धारित वेळेपूर्वी पूर्ण होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. यंदाच्या पावसाळ्यात या ठिकाणी पाणी निचऱ्याची चाचणी करण्यात आली असून, पावसाचे पाणी साचणार नाही आणि निचरा सुरळीत होईल, यादृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. नाशिकला येणारे भाविक व पर्यटक यांना आवश्यक व पायाभूत सेवा-सुविधांबाबत अधिक दक्ष राहण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.



तुकाराम मुंढेंच्या FDA कारवाईवर मंत्र्यांची मोठी घोषणा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) कारवायांमुळे सध्या व्यापारी आणि व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर भेसळयुक्त, खराब आणि नियमबाह्य अन्नपदार्थांविरोधात कारवाई सुरू असतानाच, काही अधिकारी आपल्या कार्यक्षेत्राबाहेर जाऊन कारवाई करत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. अन्न व औषध प्रशासन खात्याचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना थेट इशारा दिला आहे. नियमांच्या बाहेर जाऊन कारवाई केल्याचे सिद्ध झाल्यास दोषींवर निलंबनाची कारवाई होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार राज्यात भेसळयुक्त आणि नियमबाह्य अन्नपदार्थांविरोधात कारवाई केली जात आहे. दसरा आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर तपासणी मोहिमांनाही वेग आला आहे. मात्र, काही ठिकाणी अधिकाऱ्यांकडून अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन कारवाई होत असल्याचा आरोप आस्थापनाधारकांकडून करण्यात येत आहे.या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे सांगितले. संबंधित प्रकरणात पाच ते सात अधिकारी किंवा अन्य व्यक्ती दोषी आढळल्यास त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.FDA अधिकाऱ्यांच्या कारवाईसंदर्भातील प्रकरणाची मुख्यमंत्र्यांनी दखल घेतल्याचे झिरवाळ यांनी सांगितले. दोषींवर कोणती कारवाई करायची, याबाबत मुख्यमंत्री निर्णय घेतील. आवश्यक असल्यास संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबनही केले जाऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. दोन दिवसांपूर्वी FDA मधील पाच अधिकाऱ्यांवरील निलंबनाच्या कारवाईवरूनही चर्चा रंगली होती. नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे सुपारीच्या ट्रकवर करण्यात आलेल्या कारवाईत भ्रष्टाचार झाल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर हा मुद्दा ऐरणीवर आला. या प्रकरणाची मुख्यमंत्र्यांनी दखल घेतल्याची माहिती आहे.दुसरीकडे, अन्न व औषध प्रशासनाने १४ आणि १५ ऑक्टोबर रोजी कोकण व पुणे विभागात विशेष शोधमोहीम राबवली. या मोहिमेत मुदतबाह्य आणि खराब अन्नपदार्थांची विल्हेवाट लावण्याच्या नावाखाली त्यांची पुन्हा खुल्या बाजारात विक्री करणाऱ्या साखळीचा पर्दाफाश झाल्याची माहिती प्रशासनाने दिली. या कारवाईदरम्यान एकूण ४८ लाख ८ हजार ९२४ रुपये किमतीचा संशयास्पद व खराब अन्नसाठा आढळून आला. भिवंडी, चाकण-निघोजे परिसरातील मोठ्या कंपन्यांच्या पाच गोदामांचे परवाने तात्काळ निलंबित करण्यात आले. तसेच, दोन विनापरवाना आस्थापनांना व्यवसाय बंद करण्याचे निर्देश देण्यात आले. एकीकडे अन्नसुरक्षेच्या दृष्टीने FDA कडून कारवाई सुरू असताना, दुसरीकडे अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई होण्याची शक्यता आहे.



22 तासांपासून मृत्यूशी झुंज!

मुंबई : राजस्थानच्या फलोदी जिल्ह्यातील लोहावट परिसराच्या नौसर गावातील बोअरवेलमध्ये अडकलेल्या 9 वर्षीय भोमारामला बाहेर काढण्यासाठी मागील 22 तासांपासून अथक प्रयत्न सुरू आहेत. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. वळपास 15 ते 20 फूटवर एक मोठं दगड असल्याने नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्सआणि स्टेट डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स या पथकासमोर अनेक आव्हान उभी ठाकली आहेत.प्रशासन या अडथळ्याला दूर करणे आणि मुलापर्यंत पोहचण्यासाठी स्थानिक पातळीवर विविध साहित्यांसह अनेक पर्यायांचा वापर करत आहे.

नाशिकमध्ये बाल लैंगिक शोषणाचे २५० व्हिडिओ व्हायरल

जन सम्राट टाईम्स

नाशिक | प्रतिनिधी: शहरातून बाल लैंगिक शोषणाशी संबंधित धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुमारे दीड वर्षांच्या कालावधीत अल्पवयीन मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित सुमारे २५० व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आल्याचे सायबर पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. या प्रकरणी २३ टिपलाइन आयडीधारक, प्रोफाइलधारक आणि संबंधित मोबाईलधारकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मिळालेल्या अलर्टच्या आधारे नाशिक सायबर पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांची छाननी करून ही कारवाई केली. अशा प्रकारच्या सामग्रीच्या प्रसारावर कारवाई करण्यासाठी सायबर यंत्रणा देशभर सक्रिय आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, ११ नोव्हेंबर २०२४ ते २७ जुलै २०२६ या कालावधीत संशयितांकडून सोशल मीडियावर अशा व्हिडिओंचा प्रसार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय सायबर टिपलाइन तसेच नाशिक शहरातून संबंधित आयपी ॲड्रेसची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. त्यातून सुमारे २५० व्हिडिओ अपलोड किंवा प्रसारित झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर २३ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले असून, त्यांच्या डिजिटल हालचालींचा तपास केला जात आहे.हा प्रकार केवळ काही व्यक्तींपुरता मर्यादित आहे की त्यामागे मोठे रॅकेट कार्यरत आहे, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. संशयितांकडून सोशल मीडियावरील बनावट प्रोफाइलचा वापर करण्यात आला होता का, तसेच या माध्यमातून अल्पवयीन मुलांना किंवा त्यांच्या पालकांना ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न झाला का, याचाही तपास केला जात आहे. तांत्रिक आणि फॉरेन्सिक पुराव्यांच्या आधारे या प्रकरणातील अन्य संबंधितांचा शोध घेतला जात आहे. अल्पवयीनांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित कोणतीही सामग्री फॉरवर्ड, डाउनलोड किंवा साठवून ठेवणे टाळावे, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अशा प्रकारची सामग्री आढळल्यास ती संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर रिपोर्ट करून राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर माहिती देता येते. नाशिक जिल्हा प्रशासनाच्या माहितीनुसार सायबर गुन्ह्यांसाठी १९३० ही हेल्पलाइन उपलब्ध आहे.शहरातून बाल लैंगिक शोषणाशी संबंधित धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सुमारे दीड वर्षांच्या कालावधीत अल्पवयीन मुलांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित सुमारे २५० व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आल्याचे सायबर पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. या प्रकरणी २३ टिपलाइन आयडीधारक, प्रोफाइलधारक आणि संबंधित मोबाईलधारकांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयाकडून मिळालेल्या अलर्टच्या आधारे नाशिक सायबर पोलिसांनी तांत्रिक पुराव्यांची छाननी करून ही कारवाई केली. अशा प्रकारच्या सामग्रीच्या प्रसारावर कारवाई करण्यासाठी सायबर यंत्रणा देशभर सक्रिय आहे.



जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

'दुष्काळाकडे समस्या म्हणून नव्हे, तर संधी म्हणून पाहा!'

केवळ पावसावर अवलंबून राहू नका; दुग्ध व्यवसाय, पूरक उद्योग आणि जलसंधारणावर भर द्या

जन सम्राट टाईम्स

पिंपरी-चिंचवड। प्रतिनिधी: दुष्काळामुळे खचून न जाता त्यातून नव्या संधी शोधा, असा मोलाचा सल्ला आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी शेतकरी आणि ग्रामीण उद्योजकांना दिला. पिंपरी-चिंचवड येथे आयोजित 'ग्लोबल मराठा बिझनेस एक्स्पो'मध्ये ते बोलत होते. दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी केवळ शासनाच्या मदतीवर आणि पावसावर अवलंबून न राहता दुग्ध व्यवसायासारख्या पूरक व्यवसायांकडे वळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यासाठी जलसंधारण, पाण्याचे नियोजन आणि उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्यावर त्यांनी भर दिला. दुष्काळाच्या पुढील सहा-सात महिन्यांचे नियोजन करा! दुष्काळाकडे केवळ संकट म्हणून पाहण्याऐवजी त्याची कारणे समजून घेऊन त्यावर उपाय शोधले पाहिजेत, असे मुंढे यांनी स्पष्ट केले. शासनाचे काम मदत करणे असून शासनाकडून मदत मिळत राहील; मात्र त्याचबरोबर शेतकऱ्यांनीही भविष्यातील परिस्थितीचा विचार करून नियोजन करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले. दुष्काळाच्या काळात पुढील सहा ते सात महिन्यांत उपलब्ध साधनसंपत्तीचा वापर कसा करता येईल, उत्पन्नाचे पर्यायी मार्ग कोणते असू शकतात आणि पाण्याचा काटकसरीने वापर कसा करता येईल, याचा विचार करण्याचे आवाहन त्यांनी केले. संकटाला केवळ अडथळा न मानता त्यातून व्यवसायाच्या नव्या संधी शोधण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले. दुग्ध व्यवसायात मोठी संधी; शुद्ध दुधाला मागणी दुग्ध व्यवसाय हा ग्रामीण भागासाठी उत्पन्नाचा महत्त्वाचा पर्याय ठरू शकतो, असे मत मुंढे यांनी व्यक्त केले. अन्न व औषध प्रशासनाशी संबंधित कामाचा संदर्भ देताना त्यांनी दुधाची उपलब्धता, गुणवत्ता आणि दुग्ध व्यवसायातील संधी याकडे लक्ष वेधले. शुद्ध आणि गुणवत्तापूर्ण दुधाला बाजारपेठेत मागणी आहे. त्यामुळे दुग्ध व्यवसायासोबतच दूध प्रक्रिया आणि दुग्धजन्य पदार्थ निर्मितीसारखे उद्योग विकसित करण्याची संधी ग्रामीण भागात उपलब्ध आहे. योग्य नियोजन, पाण्याचे व्यवस्थापन आणि गुणवत्तेची काळजी घेतल्यास या क्षेत्रातून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळू शकते, असे त्यांनी सांगितले. दुग्ध व्यवसायात गैरप्रकार रोखणे आणि दुधाची गुणवत्ता टिकवणे आवश्यक असून, या प्रक्रियेत शेतकरी, उद्योजक आणि संबंधित यंत्रणांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहनही त्यांनी केले. दरवर्षी टँकर मागतो; पण पाण्याचा हिशेब ठेवतो का? पाणीटंचाईच्या प्रश्नावर भाष्य करताना मुंढे यांनी ग्रामीण भागातील नियोजनावर महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. दरवर्षी दुष्काळ पडला की टँकर, विंधनविहिरी आणि अन्य सुविधांची मागणी केली जाते. शासनाकडून या मागण्यांनुसार मदतही केली जाते; मात्र या उपाययोजनांचा दीर्घकालीन परिणाम काय झाला, याचा आढावा घेतला जातो का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एखाद्या गावात किती विंधनविहिरी खोदण्यात आल्या, त्यांचा प्रत्यक्ष उपयोग किती झाला त्यातून कितपत तोडगा निघाला, याचे योग्य लेखांकन होणे आवश्यक आहे. तात्पुरत्या उपायांबरोबरच कायमस्वरूपी नियोजनावर भर दिला पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हाच शाश्वत मार्ग ग्रामीण भागात पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत मुरवणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज असल्याचे मुंढे यांनी अधोरेखित केले.



शिवसेनेच्या काही मंत्र्यांना मंत्रिमंडळातून डच्चू मिळणार?

एकनाथ शिंदेंच्या आमदाराचे मोठे संकेत;"परफॉर्मन्स पाहून काहींची रिप्लेसमेंट होणारच

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी : राज्यात विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील अंतर्गत मतभेदांची चर्चा सुरू असतानाच, शिवसेनेच्या शिंदे गटातील काही मंत्र्यांच्या संभाव्य फेरबदलाबाबत महत्त्वाचे संकेत समोर आले आहेत. मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेऊन बदल केले जाऊ शकतात, असे वक्तव्य शिवसेनेचे भंडारा येथील आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या मंत्रिमंडळात फेरबदल होण्याच्या शक्यतेबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. मात्र, कोणत्या मंत्र्यांना बदलले जाणार, याबाबत त्यांनी कोणतीही नावे स्पष्ट केलेली नाहीत.'परफॉर्मन्स पाहून रिप्लेसमेंट होणारच' भंडारा येथे शिवसेनेच्या वतीने नागपूर पदवीधर मतदारसंघातील उमेदवाराच्या प्रचारासाठी आयोजित सभेत नरेंद्र भोंडेकर बोलत होते. या सभेला भाजपचे नेते तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचीही उपस्थिती होती. शिवसेनेच्या मंत्र्यांच्या कामगिरीबाबत विचारले असता भोंडेकर यांनी, एकनाथ शिंदे यांचे मंत्रिमंडळ फेरबदलाबाबतचे सूत्र ठरलेले असून, अडीच-अडीच वर्षांच्या कालावधीचा विचार केला जातो, असे सांगितले. मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेऊन काहींच्या जागी अन्य व्यक्तींना संधी दिली जाऊ शकते, असे संकेतही त्यांनी दिले. "परफॉर्मन्स पाहून काही रिप्लेस होणारच आहेत," या त्यांच्या वक्तव्यामुळे मंत्रिमंडळातील संभाव्य बदलांचा मुद्दा चर्चेत आला आहे. तथापि, हा बदल नेमका कधी होणार आणि त्यात कोणाचा समावेश असेल, याबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. विधान परिषद निवडणुकीत महायुतीसमोर आव्हान राज्यात तीन पदवीधर आणि दोन शिक्षक मतदारसंघ अशा



पाच जागांसाठी विधान परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकीत काही ठिकाणी महायुतीतील घटक पक्षांमध्ये उमेदवारीवरून मतभेद निर्माण झाल्याचे चित्र आहे. जागावाटप आणि स्थानिक राजकीय समीकरणांमुळे युतीतील समन्वयाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यानच मंत्रिमंडळातील संभाव्य फेरबदलाचे संकेत आल्याने शिवसेनेच्या शिंदे गटातील मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला जात आहे का, याबाबत राजकीय चर्चांना वेग आला आहे. मात्र, भोंडेकर यांच्या वक्तव्यावरून कोणत्याही विशिष्ट मंत्र्याचे पद जाणार असल्याचा निष्कर्ष काढता येत नाही. पुणे शिक्षक मतदारसंघातही उमेदवारीवरून मतभेद दरम्यान, पुणे शिक्षक मतदारसंघातील उमेदवारीवरूनही महायुतीमध्ये मतभेद समोर आले होते. या जागेवर शिवसेनेच्या शिंदे गटाने दावा केला होता; मात्र जागा भाजपच्या वाट्याला गेल्यानंतर शिवसेनेचे मंगेश चिवटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. नंतर त्यांनी अर्ज मागे घेतला. त्यानंतर शिवसेना शिंदे गटाने सचिन सानप यांना पुरस्कृत उमेदवार म्हणून पाठिंबा दिल्याची माहिती आहे. या घडामोडींमुळे महायुतीतील जागावाटप आणि घटक पक्षांमधील समन्वयाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. विधान परिषद निवडणुकीतील घडामोडी आणि मंत्र्यांच्या कामगिरीबाबत भोंडेकर यांनी दिलेले संकेत यामुळे आगामी काळात मंत्रिमंडळ फेरबदलाचा विषय चर्चेत राहण्याची शक्यता आहे. राज्यात विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीमधील अंतर्गत मतभेदांची चर्चा सुरू असतानाच, शिवसेनेच्या शिंदे गटातील काही मंत्र्यांच्या संभाव्य फेरबदलाबाबत महत्त्वाचे संकेत समोर आले आहेत. मंत्र्यांच्या कामगिरीचा आढावा घेऊन बदल केले जाऊ शकतात, असे वक्तव्य शिवसेनेचे भंडारा येथील आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे राज्याच्या मंत्रिमंडळात फेरबदल होण्याच्या शक्यतेबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. मात्र, कोणत्या मंत्र्यांना बदलले जाणार, याबाबत त्यांनी कोणतीही नावे स्पष्ट केलेली नाहीत. 'परफॉर्मन्स पाहून रिप्लेसमेंट होणारच' भंडारा येथे शिवसेनेच्या वतीने नागपूर पदवीधर मतदारसंघातील उमेदवाराच्या प्रचारासाठी आयोजित सभेत नरेंद्र भोंडेकर बोलत होते. या सभेला भाजपचे नेते तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचीही उपस्थिती होती. शिवसेनेच्या मंत्र्यांच्या कामगिरीबाबत विचारले असता भोंडेकर यांनी, एकनाथ शिंदे यांचे मंत्रिमंडळ फेरबदलाबाबतचे सूत्र ठरलेले असून, अडीच-अडीच वर्षांच्या कालावधीचा विचार केला जातो.

संपादकीय

मतदारयाद्यांचा विश्वास टिकविण्याचे आव्हान!

'एसआयआर'च्या वादाच्या सावटाखाली 'एसएसआर'; निवडणूक आयोगाने पारदर्शकता, निष्पक्षता आणि मतदारांच्या विश्वासाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. लोकशाही व्यवस्थेचा खरा आधार केवळ निवडणुका घेण्यात नसतो, तर त्या निवडणुकांमध्ये प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाची समान संधी मिळण्यात असतो.

मतदारयादी ही या संपूर्ण प्रक्रियेचा पाया आहे. या यादीत पात्र मतदाराचे नाव असणे आणि अपात्र नोंदींची योग्य पद्धतीने दुरुस्ती होणे, या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. मात्र, मतदारयादी तयार करण्याची किंवा तिची पडताळणी करण्याची प्रक्रिया जेव्हा राजकीय वादाच्या भोवऱ्यात सापडते, तेव्हा प्रश्न केवळ प्रशासकीय कार्यपद्धतीचा राहत नाही; तो लोकशाहीवरील विश्वासाचा बनतो. सध्या मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणी प्रक्रियेवरून म्हणजेच 'एसआयआर'वरून निर्माण झालेला वाद आणि त्याच पार्श्वभूमीवर चौदा राज्ये व तीन केंद्रशासित प्रदेशांत विशेष संक्षिप्त पडताळणी प्रक्रिया अर्थात 'एसएसआर' राबविण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय, याकडे याच दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. विशेष संक्षिप्त पडताळणी ही काही नवीन प्रक्रिया नाही. मतदारयाद्यांमध्ये नव्या पात्र मतदारांची नावे समाविष्ट करणे, स्थलांतरित झालेल्या मतदारांच्या नोंदी अद्ययावत करणे, नावातील चुका दुरुस्त करणे आणि आवश्यक त्या बदलांची नोंद घेणे, यासाठी अशा मोहिमा राबविल्या जातात. लोकसंख्येतील बदल, नव्याने मतदानासाठी पात्र ठरणारे युवक आणि नागरिकांच्या बदलत्या पत्त्यांमुळे मतदारयाद्या अद्ययावत ठेवणे ही नियमित प्रशासकीय गरज आहे. त्यामुळे 'एसएसआर'चा निर्णय स्वतःहून संशयास्पद ठरत नाही. परंतु कोणताही निर्णय कोणत्या परिस्थितीत घेतला जातो, त्याची अंमलबजावणी कशी केली जाते आणि त्याबाबत जनतेला कितपत विश्वासात घेतले जाते, यालाही तितकेच महत्त्व असते. 'एसआयआर' आणि 'एसएसआर'मधील फरक स्पष्ट व्हावा विशेष सखोल पडताळणी आणि विशेष संक्षिप्त पडताळणी या दोन प्रक्रियांमधील मूलभूत फरक नागरिकांना समजावून सांगणे आवश्यक आहे. 'एसआयआर'मध्ये मतदारयादीची अधिक व्यापक पातळीवर तपासणी केली जाते. त्यात मतदारांच्या पात्रतेची आणि संबंधित नोंदींची सखोल पडताळणी करण्यावर भर असतो. दुसरीकडे, 'एसएसआर'मध्ये विद्यमान मतदारयादीतील नोंदी अद्ययावत करणे, नवीन पात्र मतदारांची नावे समाविष्ट करणे आणि आवश्यक दुरुस्त्या करणे, हा प्रमुख उद्देश असतो. या दोन्ही प्रक्रियांना एकाच तराजूत तोलणे योग्य नाही. मात्र, 'एसआयआर'च्या अंमलबजावणीदरम्यान काही ठिकाणी उपस्थित झालेल्या आक्षेपांमुळे आणि त्यावरून तापलेल्या राजकीय वातावरणामुळे 'एसएसआर'बाबतही प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. निवडणूक आयोगाने केवळ या दोन प्रक्रियांतील तांत्रिक फरक सांगून थांबता कामा नये; तर प्रत्यक्ष अंमलबजावणीत पात्र मतदारांचे कोणतेही नुकसान होणार नाही, याची खात्री देणारी यंत्रणाही उभी करावी. महाराष्ट्राचा समावेश का नाही? चौदा राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांत 'एसएसआर' राबविण्याचा निर्णय घेतल्यानंतर महाराष्ट्राचा त्यात समावेश का करण्यात आलेला नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुसरीकडे, ज्या राज्यांची निवड करण्यात आली आहे, त्यामागील निकष कोणते, असा सवालही केला जात आहे. या प्रश्नांची उत्तरे राजकीय आरोपांमध्ये शोधण्यापेक्षा निवडणूक आयोगाने अधिकृत आणि स्पष्ट माहितीच्या आधारे द्यायला हवीत. एखाद्या राज्याचा समावेश करणे किंवा न करणे यामागे मतदारयादीच्या पुनरावलोकनाची गरज, प्रशासकीय तयारी, मागील प्रक्रियेची स्थिती किंवा अन्य निकष असू शकतात. परंतु हे निकष जनतेसमोर स्पष्ट नसतील, तर संशयाला वाव मिळतो. निवडणूक आयोगाने राज्यनिहाय निर्णयामागील कारणे, प्रक्रियेचे वेळापत्रक आणि अंमलबजावणीची पद्धत जाहीर केल्यास अनेक प्रश्नांना उत्तर मिळू शकते. निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था आहे. तिच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे हा लोकशाहीतील अधिकार आहे; मात्र त्या प्रश्नांना उत्तर देण्याची जबाबदारीही आयोगाची आहे.sss

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

बीडमध्ये दुष्काळाचे संकट गडद; २२५ टँकर्स सुरू : सुनेत्रा पवारा

जन सम्राट टाईम्स

बीड। प्रतिनिधी : पावसाने दिलेल्या प्रदीर्घ खंडामुळे बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीचा तसेच प्रशासकीय उपाययोजनांचा सविस्तर आढावा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज (शनिवार, 17 ऑक्टोबर) जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला. या बैठकीस आमदार प्रकाश सोळुंके, आमदार धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे आणि जिल्हा नियोजन अधिकारी शीला मिसाळ यांच्यासह सर्व संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.सध्या पावसाअभावी शेतकऱ्यांच्या हाती आलेले पीक करपले असून पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर पीक नुकसानाचे पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. बहुतांश पंचनामे पूर्ण होत आले असून अहवाल प्राप्त होताच नियमानुसार पुढील कार्यवाही गतिमान करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच पीक विमा प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता आणि अचूकता राखण्याचे निर्देश संबंधित कृषी व महसूल अधिकाऱ्यांना देण्यात आले.खर्च टाळावा तसेच सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करावे, असे आवाहन केले.पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले असून सध्या सुरू असलेल्या पाण्याच्या टँकर्सवर



जीपीएस (GPS) प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्ह्यात सध्या २२५ टँकर्सद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. पिण्यायोग्य पाण्याचा वापर कोणत्याही परिस्थितीत बांधकामासाठी करू नये आणि पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा, असेही स्पष्ट करण्यात आले. याशिवाय जलस्रोतांचे पुनर्भरण, नदी-नाल्यांचे खोलीकरण, गाळ काढणे आणि विहिरींची दुरुस्ती यांसारखी जलसंवर्धनाची कामे तातडीने हाती घेण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केल्या. जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाने आतापासूनच पूर्वनियोजन करावे आणि शेतकऱ्यांना मुरघास, हायड्रोपोनिक्स तसेच अझोला चारा उत्पादनाचे प्रशिक्षण द्यावे, असे बैठकीत सांगण्यात आले. वीबी-जी रामजी योजनेअंतर्गत रोजगार हमीची कामे जलसंवर्धनाशी जोडून प्रभावीपणे राबवावीत, जेणेकरून ग्रामीण भागातील शेतकरी आणि मजुरांना स्थानिक पातळीवरच हक्काचा रोजगार उपलब्ध होईल आणि त्यांच्यावर स्थलांतराची वेळ येणार नाही. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपापल्या मुख्यालयी थांबून नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी, तसेच शेतकऱ्यांशी संवाद वाढवून त्यांचे समुपदेशन करावे.

पुस्तकांशी मैत्री अन् स्वच्छतेचा संदेश!

जि.प. प्राथमिक शाळा किन्ही येथे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम जयंतीनिमित्त वाचन

जन सम्राट टाईम्स

किन्ही, ता. सोयगाव । प्रतिनिधी : विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन संस्कृती रुजावी आणि स्वच्छतेच्या सवयी बालवयातच अंगीकारल्या जाव्यात, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किन्ही येथे भारताचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन तसेच जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. 'वाचाल तर वाचाल'; पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी गोष्टींची पुस्तके, बालसाहित्य आणि माहितीपूर्ण पुस्तकांचे वाचन केले. पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाचा विस्तार होतो, कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला मदत होते, याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. 'वाचाल तर वाचाल' हा संदेश देत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचन करण्याचे आणि पुस्तकांशी मैत्री जपण्याचे आवाहन केले. डॉ. कलाम यांच्या ज्ञान, विज्ञान आणि शिक्षणविषयक विचारांतून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी



आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी, असा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. प्रात्यक्षिकातून हात धुण्याचे महत्त्व जागतिक हात धुवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना हात धुण्याची योग्य पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगण्यात आली. जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर आणि हात अस्वच्छ झाल्यावर साबणाने हात धुणे का आवश्यक आहे, याची माहिती देण्यात आली. 'स्वच्छ हात, निरोगी आयुष्य' हा संदेश देत वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. नियमित स्वच्छतेच्या सवयींमुळे अनेक संसर्गजन्य आजारांचा धोका कमी करण्यास मदत होते, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.

शाळा व्यवस्थापन समितीची उपस्थिती या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रियाज शेख, उपाध्यक्ष विजय निकम, समितीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाचनाची प्रेरणा आणि स्वच्छतेची जाणीव यांची सांगड घालणारे हे दोन्ही उपक्रम शाळेत आनंददायी व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व यावेळी अधोरेखित झाले.विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचन संस्कृती रुजावी आणि स्वच्छतेच्या सवयी बालवयातच अंगीकारल्या जाव्यात, या उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किन्ही येथे भारताचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन तसेच जागतिक हात धुवा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. 'वाचाल तर वाचाल'; पुस्तकांशी मैत्री करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांनी गोष्टींची पुस्तके, बालसाहित्य आणि माहितीपूर्ण पुस्तकांचे वाचन केले. पुस्तकांच्या माध्यमातून ज्ञानाचा विस्तार होतो, कल्पनाशक्तीला चालना मिळते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला मदत होते, याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. 'वाचाल तर वाचाल' हा संदेश देत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित वाचन करण्याचे आणि पुस्तकांशी मैत्री जपण्याचे आवाहन केले. डॉ. कलाम यांच्या ज्ञान, विज्ञान आणि शिक्षणविषयक विचारांतून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाकडे वाटचाल करावी, असा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला. प्रात्यक्षिकातून हात धुण्याचे महत्त्व जागतिक हात धुवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांना हात धुण्याची योग्य पद्धत प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगण्यात आली. जेवणापूर्वी, शौचालयाचा वापर केल्यानंतर आणि हात अस्वच्छ झाल्यावर साबणाने हात धुणे का आवश्यक आहे, याची माहिती देण्यात आली. 'स्वच्छ हात, निरोगी आयुष्य' हा संदेश देत वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

हॉटेलमध्ये खाणं आता महागणार! इडली, डोसा ते जेवणाच्या थाळीपर्यंत दरवाढ

जन सम्राट टाईम्स

भडगाव | प्रतिनिधी : आधीच वाढत्या महागाईमुळे सर्वसामान्य नागरिकांचे मासिक बजेट कोलमडले आहे, अशातच आता मुंबईकरांना आणखी एक आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे. मुंबईतील हॉटेल आणि रेस्टॉरंटमध्ये मिळणाऱ्या खाद्यपदार्थांच्या किमती येत्या एक ते दोन आठवड्यांत १० ते १५ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. भाजीपाला, धान्य, डाळी, खाद्यतेल, मसाले आणि व्यावसायिक गॅसच्या वाढत्या किमतींमुळे हॉटेल व्यावसायिकांचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे खाद्यपदार्थांच्या दरात वाढ करण्याचे संकेत इंडियन हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन अर्थात 'आहार' संघटनेने दिले आहेत.

या संभाव्य दरवाढीचा सर्वाधिक फटका दररोज हॉटेलमध्ये जेवण करणारे नोकरदार, महाविद्यालयीन विद्यार्थी, कामगार आणि सर्वसामान्य कुटुंबांना बसण्याची शक्यता आहे. सकाळचा चहा-नाश्ता असो किंवा दुपारच्या जेवणाची थाळी, मुंबईकरांना प्रत्येक पदार्थासाठी अधिक पैसे मोजावे लागू शकतात. गेल्या काही महिन्यांपासून जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असल्याचे हॉटेल व्यावसायिकांचे म्हणणे आहे. विशेषतः भाजीपाला, तांदूळ, गहू, विविध डाळी, खाद्यतेल आणि मसाल्यांच्या किमतींमध्ये झालेल्या वाढीचा थेट परिणाम हॉटेलच्या दैनंदिन खर्चावर होत आहे. त्यातच महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीमुळे काही भागांतून होणाऱ्या शेतमालाच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा खर्च वाढला आहे. हॉटेल व्यावसायिकांना केवळ खाद्यपदार्थांच्या कच्च्या मालासाठीच नव्हे, कर्मचाऱ्यांचे वेतन, जागेचे भाडे, वीजबिल आणि वाहतूक खर्चासाठीही अधिक पैसे खर्च करावे लागत आहेत. त्यामुळे सध्याचे खाद्यपदार्थांचे दर कायम ठेवणे कठीण होत असल्याचे व्यावसायिकांचे म्हणणे आहे.संभाव्य दरवाढीचा परिणाम मुंबईतील छोट्या उपाहारगृहांपासून मोठ्या रेस्टॉरंटपर्यंत दिसू शकतो. सकाळी मिळणारा चहा, पोहे, उपमा, इडली, डोसा तसेच दुपारच्या आणि रात्रीच्या जेवणातील विविध पदार्थ महागण्याची शक्यता आहे.

लोकनेते ओंकारआप्पा वाघ यांना स्मृतिदिनानिमित्त अभिवादन!

देशमुख महाविद्यालयात कार्यक्रम; राजकारण, समाजकारण, कृषी आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे

जन सम्राट टाईम्स

भडगाव। प्रतिनिधी : समाजवादी विचारांचे लोकनेते, पाचोरा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. ओंकारआप्पा वाघ यांच्या स्मृतिदिनानिमित्त भडगाव येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या सामाजिक, राजकीय, कृषी आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे स्मरण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. समाजवादी विचार आणि जनसेवेचा वारसा कै. ओंकारआप्पा वाघ यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातून समाजवादी विचारांची मूल्ये जपण्याचा प्रयत्न केला.

सामान्य माणसाच्या प्रश्नांना प्राधान्य देत समाजातील विविध घटकांच्या हितासाठी त्यांनी कार्य केले. राजकारण हे केवळ सत्ताप्राप्तीचे साधन नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून अधोरेखित झाली. लोकांच्या समस्या समजून घेणे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि सामाजिक



विकासाच्या प्रक्रियेत सर्वसामान्यांना सहभागी करून घेणे, या बाबींना त्यांच्या सार्वजनिक जीवनात महत्त्वाचे स्थान होते.त्यांच्या कार्यातून सामाजिक बांधिलकी, लोकहित आणि समाजवादी विचारांचा वारसा पुढे नेण्याची प्रेरणा मिळते, असे गौरवोद्गार यावेळी मान्यवरांनी काढले. प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. स्मृतिदिनानिमित्त लोकनेते ओंकारआप्पा वाघ यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांच्या विचारांचा आणि समाजहिताच्या भूमिकेचा वारसा जपण्याचा संदेश देण्यात आला.समाजवादी विचारांचे लोकनेते, पाचोरा विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. ओंकारआप्पा वाघ यांच्या स्मृतिदिनानिमित्त भडगाव येथील सौ. रजनीताई नानासाहेब देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी त्यांच्या सामाजिक, राजकीय, कृषी आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे स्मरण करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. गायकवाड होते. समाजवादी विचार आणि जनसेवेचा वारसा कै. ओंकारआप्पा वाघ यांनी आपल्या सार्वजनिक जीवनातून समाजवादी विचारांची मूल्ये जपण्याचा प्रयत्न केला. सामान्य माणसाच्या प्रश्नांना प्राधान्य देत समाजातील विविध घटकांच्या हितासाठी त्यांनी कार्य केले. राजकारण हे केवळ सत्ताप्राप्तीचे साधन नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे, ही भूमिका त्यांच्या कार्यातून अधोरेखित झाली.लोकांच्या समस्या समजून घेणे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे आणि सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत सर्वसामान्यांना सहभागी करून घेणे, या बाबींना त्यांच्या सार्वजनिक जीवनात महत्त्वाचे स्थान होते.

भुसावळात दरोड्याचा कथित कट उधळला!

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी : भुसावळ शहरातील वांजोळा रोडवरील स्वामी विहार कमानीजवळ दरोड्याच्या तयारीत असल्याच्या संशयावरून सहा जणांच्या टोळीविरुद्ध भुसावळ शहर पोलिसांनी कारवाई केल्याची माहिती समोर आली आहे. शुक्रवारी रात्री पोलिसांनी केलेल्या कारवाईत तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले, तर अन्य तीन जण घटनास्थळावरून फरार झाले. या कारवाईत गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे आणि इतर साहित्य जप्त करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. संभाव्य दरोड्याचा प्रयत्न रोखल्याच्या या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे. गुप्त माहिती मिळताच पोलिसांची धाव मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी रात्री सुमारे पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास वांजोळा रोडवरील स्वामी विहार कमानीजवळ काही संशयित व्यक्ती दरोडा टाकण्याच्या उद्देशाने जमल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत कारवाई केली. भुसावळ शहरातील वांजोळा रोडवरील स्वामी विहार कमानीजवळ दरोड्याच्या तयारीत असल्याच्या संशयावरून सहा जणांच्या टोळीविरुद्ध भुसावळ शहर पोलिसांनी कारवाई केल्याची माहिती समोर आली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

भडगाव पंचायत समितीसमोर दिनेश महाजन यांचे बेमुदत धरणे आंदोलन!

कजगावमधील गट क्र. १३१/१/३३ वरील नमुना क्रमांक ८ च्या नोंदींचा वाद

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: भडगाव तालुक्यातील कजगाव येथील गट क्रमांक १३१/१/३३ मधील नमुना क्रमांक ८ च्या नोंदी आणि त्यासंदर्भातील ठरावाच्या वैधतेवरून वाद निर्माण झाला आहे. या प्रकरणातील कथित अनियमित नोंदी आणि संबंधित ठराव रद्द करण्याच्या मागणीसाठी दिनेश सुखदेव महाजन यांनी १४ ऑक्टोबर २०२६ पासून भडगाव पंचायत समिती कार्यालयाच्या आवारात बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाला चार दिवस उलटूनही पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि ग्रामपंचायत प्रशासन पुढे कोणती भूमिका घेणार, याकडे लक्ष लागले आहे. पंचायत समितीकडून संबंधित ठराव रद्द करण्याबाबत आदेश देण्यात आल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. मात्र, त्यानंतरही वादग्रस्त नोंदी आणि ठरावाबाबत अपेक्षित कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप दिनेश महाजन यांनी केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायत कजगावच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होत असून, संबंधित आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली आहे की नाही, याची अधिकृत स्पष्टता देण्याची मागणी होत आहे. पंचायत समितीच्या आदेशानंतरही कार्यवाही रखडली? आंदोलकांनी दिलेल्या माहितीनुसार, भडगाव पंचायत समिती कार्यालयाच्या जा. क्र. ग्रा.पं./वि.अ.आरआर/४५२/२०२६ या पत्राद्वारे ग्रामपंचायत कजगावने



